# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

NO.: MERC/ADM/RTI/026/2025/0189 | Dt. 20.03.2025

प्रति,
श्री. अनिल चौधरी,
मोरेश्वर रेसिडेंन्सी रो हाऊस नंबर ५,
नुरसिंह हॉस्पिटलच्या मागे,
दापोडी पिंपल गुरव रोड, दापोडी,
पुणे - ४११०१२.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि.०४.०३.२०२५ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) प्रमाणे केलेला अर्ज, आयोगाच्या कार्यालयास दि.०७.०३.२०२५ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील मधील माहिती खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| माझ्या विद्युत देयकामध्ये खालील शुल्क आकारले आहेत. ज्याबद्दल मला स्पष्टीकरण हवे आहे: देयकातील शुल्क | | |
| १ | स्थिर आकार (Fixed Charges): हा आकार कशासाठी लावला जातो? याची गणना कशी केली जाते? कोणत्या कायद्याच्या अंतर्गत हा आकारला आहे? | विचारण्यात आलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात आहे. उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर जन माहिती अधिकाऱ्याने शोधणे हे माहिती अधिकार कायदा, २००५ नुसार अपेक्षित नाही.<br><br>अन्वयार्थ, मते, सल्ला, स्पष्टीकरण, कारणे यासारखी अमूर्त माहिती जन माहिती अधिकाऱ्याने पुरवणे अपेक्षित नाही, कारण माहितीचा अधिकार, २००५ च्या कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येमध्ये सदर बाबी समाविष्ट नाहीत*<br><br>सदर अर्जामध्ये उल्लेख केलेल्या वेगवेगळ्या आकारांशी संबंधित माहिती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०२४ मध्ये उपलब्ध आहे. सदर विनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहेत.<br><br>वीज शुल्क आणि वीज विक्री कर हे महाराष्ट्र शासन यांच्याद्वारे निश्चीत केले जातात. |
| २ | वीज आकार (Energy Charges): हा आकार प्रति युनिट किती आहे? कोणत्या आधारावर याची गणना केली जाते? | |
| ३ | वहन आकार (Wheeling Charges): हे शुल्क काय आहे? कोणाला दिले जाते?कोणत्या कायद्याच्या अंतर्गत हे शुल्क आकारले जाते? | |
| ४ | इंधन समायोजन आकार (Fuel Adjustment Charges): हा आकार कशासाठी असतो?याची गणना करण्याची पद्धत काय आहे? हे शुल्क वारंवार बदलू शकते का? कोणत्या कायद्याच्या अंतर्गत हे शुल्क आकारले जाते? | |
| ५ | वीज शुल्क (Electricity Duty): हे शुल्क कोणत्या कायद्याच्या अंतर्गत आकारले जाते? याची गणना कशी केली जाते? | |
| ६ | वीज विक्री कर (Electricity Sales Tax): हा कर कोणत्या कायद्याच्या अंतर्गत आकारला जातो? याची गणना कशी केली जाते? | |
| ७ | इतर आकार (Other Charges): देयकात नमूद केलेले 'इतर आकार' म्हणजे काय? यात कोणते शुल्क समाविष्ट आहेत? हे शुल्क कोणत्या कायद्याच्या अंतर्गत आकारले जातात? | |

*माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रकरण एक मधील २ (च) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री. अभिजीत चाटुफळे, सह संचालक (प्रशासन व वित्त) / प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४ / ६५ / ६९ **Email:** **abhijeet.chatuphale@merc.gov.in**.

आपला विश्वासू,

(अरूण वाळुंज)
जन माहिती अधिकारी तथा सह संचालक (प्रशासन व वित्त)